प्रेस नोट

दिनांक -२२/७/२०१९

**<u>युनिक स्कील डेव्हलपमेंट सेंटर (USDC) मोती चौक पुणे व विशेष बाल सुरक्षा पथक यांचे वतीने विधीसंघर्षीत मुलांसाठी वेगवेगळे व्यवसायीक कोर्ससाठी बैठकीचे आयोजन.</u>**

मा. श्री. के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे संकल्पनेतुन भरोसा सेलची निर्मिती ९ जानेवारी २०१९ रोजी करणेत आली आहे. त्यामध्ये विशेष बाल सुरक्षा विभाग कार्यरत असुन विधीसंघर्षित बालकांचे समुपदेशन करुन त्यांना गुन्हेगारीपासुन परावृत्त करुन समाजाचे मुख्य प्रवाहात आणणेसाठी वेगवेगळे प्रयत्न करणेत येत आहेत. मा.अपर पोलीस आयुक्त सो.गुन्हे पुणे शहर यांचे संकल्पनेतून युनिक स्कील डेव्हलपमेंट सेंटर (USDC) मोती चौक पुणे यांच्यातर्फे चालणारे वेगवेगळे व्यवसायीक कोर्सेस उदा.इलेक्ट्रीशियन,फ्रिज रिपेअरींग,मोबाईल रिपेअरींग,कॉम्प्युटर कोर्सेस,(सॉफटवअर,हार्डवेअर) फॅशन डिझायनिंग, पेंटींग असे ३ ते ६ महीण्याकरीता घेतले जातात सदर कोर्सची माहीती विधीसंघर्षीत बालकांना देवून सदर इच्छुक बालकांना सवलतीमध्ये सदर कोर्स उपलब्ध करुन देणेसाठी आरसीएम गुजराती हायस्कुल फडके हौद चौक पुणे येथे मिटींग आयोजीत करण्यात आली होती. सदर मिटींगला विधीसंघर्षीत बालक व त्यांचे पालक असे १०० लोक हजर होते. तसेच युनिक स्कील डेव्हलपमेंट सेंटर (USDC) मोती चौक पुणे चे डायरेक्टर बाळासाहेब झरेकर, फाऊंडर डायरेक्टर श्री.विजय कुलकर्णी व स्टाफ,मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.मोराळे सो.व मा.पोलीस उप-आयुक्त गुन्हे श्री.बच्चनसिंह यांचे मार्गदर्शनाखाली विशेष बाल सुरक्षा पथकाकडील पोलीस निरीक्षक श्रीमती शिल्पा चव्हाण व स्टाफ तसेच पोलीस स्टेशनकडील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

**(शिल्पा चव्हाण)**
पोलीस निरीक्षक
विशेष बाल सुरक्षा पथक
गुन्हे शाखा पुणे शहर